**<u>प्रतिवादी क्र.६ तर्फे उलटतपास श्री.बी.बी.क्षिरसागर, वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>**

**६०.** प्रतिवादी क्र.६ चे शिक्षण बी.एस.सी. पर्यंत झालेले आहे. १९९१ सालापर्यंत प्रतिवादी क्र.६ शिकत होता, हे खरे नाही. १९८९-९० सालापर्यंत प्रतिवादी क्र.६ शिकत होता. १९९१ साली त्याचे लग्न झाले. वादी क्र.१ यांचे शिक्षण किती किंवा कसे झाले आहे, याबद्दल मला माहिती नाही. १९८१ साली वादी क्र.१ हे वन खात्यात नोकरीस लागले. त्यांची नेमणूक थेट वर्ग-२ अधिकारी म्हणून झाली किंवा कसे हे मला माहिती नाही. हे खरे की, त्यांचे प्रशिक्षण दार्जिलिंगमध्ये झाले.

**६१.** माझे वडील प्रभाकर हे ४-५ वी पर्यंत शिकले आहेत. प्रतिवादी क्र.६ यांची ज्ञानेश्वर विद्यालय, कोपरा येथे १९९३ ते १९९७-९८ पर्यंत नोकरी होती. त्यानंतर मुक्ताई आश्रमशाळा किनगांव येथे त्यांनी १९९८ ते २००२ अशी नोकरी केली. त्यानंतर नळेगांव, ता. चाकूर येथे सन २०१० पर्यंत त्यांनी नोकरी केली. त्या पुढील त्यांच्या नोकरीबद्दल मला माहित नाही. हे खरे नाही की, कॉलेज जीवनापासून प्रतिवादी क्र.६ हे मानसिक आजाराने ग्रस्त असल्याने त्यांच्यावर उपचार चालू होते. हे खरे नाही की, त्यांची मानसिक अवस्था चांगली नसल्याने त्यांना कोणतीही नोकरी टिकवून धरता आली नाही व प्रत्येकवेळी त्यांना कामावरुन काढून टाकले. मिरज येथील मानसिक उपचार इसपीतळात त्यांच्यावर औषध-उपचार चालू होते, याबद्दल मला माहिती नाही. सर्वसामान्य व्यक्तीप्रमाणे वागणूक रहावी म्हणून आजही त्यांना औषधे चालू आहेत, याबद्दल मला माहिती नाही.

**६२.** माझ्या आजोबाचे नाव अंतराम संभाजी देपे आहे. अंतराम याने विकत घेतलेल्या जमिनीसह ३२ हेक्टर ४७ आर एवढी त्यांना जमीन होती, याबद्दल मला हेक्टरी सांगता येत नाही. त्यांना ७६ एकर ३५ गुंठे

एवढी जमीन होती. अंतराम यांच्या एकुण जमिनीपैकी २७ हेक्टर ९५ आर जमीन वडिलोपार्जित होती, याची मला माहिती नाही. या जमिनीबद्दल फेरफार क्र.१४७ तयार झाला असल्याची मला माहिती नाही. हे खरे की, तो कशाबद्दल झाला आहे, हे मला माहिती नाही. फेरफार क्र.२७४ हा या जमिनीबाबत झाला असल्याचे मला माहिती नाही. हे खरे की, त्यामुळे तो कशाबद्दलचा आहे, हे मला माहिती नाही. फेरफार क्र.३५३ कशाबद्दल आहे, याची मला माहिती नाही. हे खरे की, अंतरामच्या जमिनीमध्ये प्रभाकर, बालाजी आणि गंगाधर असे त्यांचे तीन मुलगे वारस आहेत. हे खरे नाही की, त्यामुळे बालाजी हा अंतरामच्या जमिनीत तिसऱ्या हिश्शाने वारस आहे. बालाजी यांना अंतरामच्या जमिनीत कितवा हिस्सा होता, हे मला सांगता येत नाही. माझया वडिलांचा अंतरामच्या जमिनीत कितवा हिस्सा होता, हे मला सांगता येत नाही. हे खरे की, गंगाधरचा हिस्सा किती, हे मला सांगता येत नाही.

**६३.** मला सिलींग कायद्याची माहिती नाही. या कायद्यान्वये एका कुंटूंबास ५५ एकरापेक्षा जास्त जमीन धारण करता येत नाही, याची मला माहिती नाही. अंतरामच्या कुंटूंबाला ५५ एकरांपेक्षा जास्त जमीन होती, हे खरे आहे. सिलींग कायद्यातून अंतरामच्या कुंटूंबाची ५५ एकरांपेक्षा ज्यादाची जमीन वाचावी म्हणून या जमिनीची फोड करण्यात आली याची मला माहिती नाही. हे खरे नाही की, अंतरामच्या जमिनीत त्याचे तीन मुलगे हेच हिश्शेदार होते. गंगाधरच्या जमिनीत त्याची मुले व पत्नी हे हिश्शेदार होते व अंतरामच्या जमिनीत ते हिश्शेदार नव्हते, हे म्हणणे खरे नाही. हे खरे नाही की, प्रभाकरच्या जमिनीतच त्यांची पत्नी म्हणजे माझी आई व त्यांची मुले हिश्शेदार आहेत. हे खरे नाही की, अंतरामच्या जमिनीची फोड करताना बालाजी यांना हिश्शेदार म्हणून घेतले, तसेच गंगाधर व प्रभाकर यांना व त्यांच्या मुलांना व त्यांच्या पत्नींना हिश्शेदार

म्हणून घेण्यात आले व फोड करण्यात आली. अंतरामच्या जमिनीची फोड करताना फक्त तीनच मुलांना हिस्सा देणे आवश्यक होते व त्यांच्या पुढच्या पिढीला हिस्सा देणे आवश्यक नव्हते, हे खरे नाही. अंतरामचे सहहिश्शेदार म्हणून त्याच्या मुलांच्या पुढच्या पिढीतील कोणीही होवू शकत नव्हते, हे म्हणणे खरे नाही. हे खरे नाही की, त्यामुळे त्या अनुषंगाने झालेला फेरफार क्र.३५६ चूकीचा आहे.

**उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष

स्वाक्षरीत/-
**( एस.एन.सरडे )**

दिनांक:१०/११/२०२५. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.